वर्ष-०८ अंक-३४ मुंबई, मंगळवार १२ ते १८ जुलै - २०२२ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 नागपुरात नाल्याला आलेल्या पुरात आईसह मुलगी गेली वाहून; आईचा मृतदेह सापडला, मुलगी बेपत्ता

3 → ठाण्यात 74 पैकी 29 अतिधोकादायक इमारतीच रिकाम्या

पन्हाळा तालुक्यातील शाळेची बस पलटी; जीवितहानी नाही, किरकोळ दुखापत ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## 7/11 मुंबई बॉम्बस्फोट प्रकरण

# 16 वर्ष लोटली तरीही दोषींच्या फाशीवर शिक्कामोर्तब नाही



11 जुलै 2006 रोजी मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय लोकलमध्ये साखळी बॉम्बस्फोट घडवून मुंबईसहस देशाला हादरवून सोडणाऱ्या घटनेला सोमवारी 16 वर्षे पूर्ण झाली. मात्र या बॉम्बस्फोटाशी संबंधित खटल्याचा मुंबई सत्र न्यायालयानं निकाल देऊन सात वर्ष झालीत तरीही दोषींच्या फाशीवर हायकोर्टाकडून अद्याप शिक्कामोर्तब झालेलं नाही. सोमवारी यासंदर्भातील याचिका सुनावणीसाठी कोर्टापुढे आली, तेव्हा हे प्रकरण ऐकण्यासाठी किमान पाच ते सहा महिने लागणार असल्यानं सध्याचा ताण पाहता खटल्याच्या सुनावणीची तारीख निश्चित करण्यासाठी हे प्रकरण ऑगस्टपर्यंत तहकूब करण्यात आलं. अवघ्या 11 मिनिटांत झालेल्या 7 साखळी स्फोटांत तब्बल 209 निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला होता, तर 700 लोक जखमी झाले होते. या दहशतवाद्यांनी प्रेशर कुकरमध्ये टाईम बॉम्ब ठेवत मुंबई लोकलमधील फर्स्ट क्लासच्या डब्यांना लक्ष्य केलं होतं. मुंबई सत्र न्यायालयातील मोक्का न्यायालयानं 9 वर्षांनंतर याप्रकरणी निकाल दिला होता. न्यायालयानं यातील 13 पैकी 5 आरोपींना फाशीची, तर बाकीच्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. कमाल अहमद अन्सारी, मोहंमद फैजल शेख, एहत्तेशाम सिद्दीकी, नावेद हुसेन खान, आसिफ खान यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर, तन्वीर अहमद अन्सारी, मोहंमद माजिद शफी, शेख आलम शेख, मोहंमद साजिद अन्सारी, मुझम्मील शेख, सोहेल शेख आणि जमीर शेख यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. त्यानंतर या पाच आरोपींच्या फाशीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी हे प्रकरण साल 2015 मध्येच मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालं होतं. तेव्हा या प्रकरणाच्या सुनावणीसाठी विशेष खंडपीठ स्थापन करण्याची मागणी तत्कालीन मुख्य न्यायमूर्तींकडे करण्यात आली होती, जी मान्यही झाली. मात्र त्यानंतरही तीनवेळा न्यायमूर्ती निवृत्त झाल्याच्या कारणास्तव या प्रकरणावर सुनावणी होऊ शकली नाही. दरम्यान कोरोनाकाळात फाशीची शिक्षा सुनावलेल्या कमल अन्सारीचा कोठडीतच मृत्यू झालेला आहे.

# अनिल देशमुखांना दणका

## CBI तपास करत असलेल्या प्रकरणात डीफॉल्ट जामीन नाकारला



दरमहा 100 कोटींच्या कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी विशेष केंद्रीय अन्वेषण (CBI) न्यायालयात डिफॉल्ट जामीनासाठी दाखल केलेली याचिका कोर्टानं फेटाळून लावलीय. गेल्या गुरुवारी दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यावर मुंबई सत्र न्यायालयातील विशेष सीबीआय न्यायालयाने आपला राखून ठेवलेला निकाल सोमवारी जाहीर केला. तपासयंत्रणेनं यासंदर्भात केलेला युक्तिवाद मान्य करत न्यायाधीश एस.एच. गवलानी यांनी देशमुखांसह त्यांचे सचिव संजीव पालांडे आणि कुंदन शिंदे यांनाही जामीन देण्यास नकार दिला. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचाराचे आरोप केल्यानंतर हयकोर्टाच्या आदेशानुसार सीबीआयनं यात गुन्हा दाखल केला होता. त्याच गुन्ह्याच्या आधारे ईडीने देशमुखांना अटक केली होती. त्यानंतर सीबीआयनेही कारागृहात जाऊन देशमुखांची गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी करत त्यांना अटक केली होती. सीबीआयनं देशमुख आणि त्यांचे सहकारी स्वीय सचिव संजीव पालांडे आणि खासगी स्वीय सहाय्यक कुंदन शिंदे यांच्यावर आरोपपत्र दाखल केलं. सीबीआयनं याप्रकरणी बडतर्फ पोलीस अधिक्षक सचिन वाझेला माफीचा साक्षीदार घोषित केलं आहे. मात्र याप्रकरणात तपासयंत्रणेकडे कोणतेही सबळ पुरावे नसल्याचा दावा करत देशमुख यांनी डिफॉल्ट जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. सीबीआयनं दाखल केलेले आरोपपत्र केवळ 59 पानांचे असून आरोपपत्र अपूर्ण असल्यामुळे देशमुख डीफॉल्ट जामीन मिळण्यासाठी पात्र आहेत. तसेच ताब्यात घेतल्याच्या 60 दिवसांच्या आत चौकशी पूर्ण होऊन आरोपपत्र कोर्टात दाखल आवश्यक आहे.

# संपत्तीवरुन वाद, 22 वर्षीय तरुणानं आईला संपवलं, नंतर उचललं टोकाचं पाऊल



संपत्ती आणि पैशांचा वाद माणसांमध्ये माणूस ठेवत नाही. रक्ताच्या नात्यांमध्ये पैसा आणि संपत्तीसाठी दुरावा निर्माण होतो. कधी कधी हा वाद इतका टोकाला जातो की लोक एकमेकांच्या जीवावर उठतात. अशाच एका वादातून मुलानंच आईची हत्या केल्याची खळबळजनक घटना मुंबईत समोर आली आहे. मुलुंडमध्ये एक 22 वर्षीय तरुणाने स्वतःच्या आईची हत्या करून लोकल खाली उडी घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना मुलुंडमध्ये घडली आहे. छाया महेश पांचाळ असे 46 वर्षीय मयत महिलेचे नाव असून तिची हत्या तिचाच 22 वर्षीय मुलगा जय याने केली आहे. मुलुंडच्या वर्धमान नगर मध्ये पांचाळ कुटुंबीय राहतं. आज संध्याकाळी मुलुंड पोलिसांना या ठिकाणी त्यांचा घरातून रक्त येत असल्याचा कॉल प्राप्त झाला. या वेळी मुलुंड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घर उघडून पाहताच त्यांना ...पान २ वर...

# मुंबई-नाशिक महामार्गावर स्कॉर्पिओ कारमधील हत्येचा उलगडा; आर्थिक वादातून भीषण कृत्य




मुंबई - नाशिक महामार्गावर - शहापूर तालुक्यातील गोलभण गावा जवळ झाडा लगत स्कॉर्पिओ कारमध्ये मृतदेह आढळून आल्यानं परिसरात एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात अज्ञात मारेकऱ्या विरोधात हत्येसह पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला. स्कॉर्पिओ कारमधील मृतदेह स्टॉक ब्रोकर प्रफुल्ल पवार (50) यांचा असल्याचं तपासात समोर आलं होतं. त्यांची आर्थिक वादातून मित्रानंच दोन साथीदारांच्या मदतीनं हत्या केल्याचा उलगडा शहापूर पोलिसांनी केला. संदीप सरवणकर (47) हा मुंबईत राहणारा असून हत्येचा मुख्य आरोपी आहे. तर त्याचे साथीदार प्रवीण शिंदे (21), सागर मराठे (24) हे मूळचे जळगावचे आहेत. पोलिसांनी मुख्य आरोपीसह दोघांना अटक केली आहे.

डोक्यात गोळी घालून हत्या...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 4 जुलै रोजी पोलिसांच्या गस्ती पथकाला शहापूर तालुक्यातील गोलभण गावाजवळ असलेल्या मुंबई-नाशिक महामार्गावरील रस्त्याच्या कडेला पार्क केलेली स्कॉर्पिओ कार ...पान २ वर...

# सोलापुरात पन्नास लाखांचा गांजा जप्त

## सांगोला पोलिसांची मोठी कारवाई



सोलापूर - सोलापुरातील सांगोला पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी जवळपास 43 लाख 66 हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे. पेट्रोलिंग करताना पोलिसांनी इनोव्हा कारची तपासणी केली. त्यामध्ये संशयीत आरोपींनी वेगवेगळया पोत्यांत गांजा भरून ठेवला होता. सांगोला पोलिसांनी इनोव्हा कार, गांजा, मोबाईल असा एकूण 55 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी संग्राम मलाप्पा पुजारी ( रा. पुसेगाव भवानी नगर, ता. खटाव जि. सातारा यास अटक केली आहे. यावर एनडीपीएस अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.याबाबत अधिकृत माहिती पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी दिली.

पेट्रोलिंग करताना इनोव्हा कार आढळली - सांगोला पोलिस ठाण्यातील बिट मार्शल कल्याण ढवणे, सुनील लोंढे 8 जुलै रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी महुद बुद्रुक ते दिघंची जाणाऱ्या मार्गावर सांगोला रोडच्या कडेला एमएच ४३ एजे २३२७ ही सिल्व्हर रंगाची इनोवा गाडी अंधारात थांबलेली दिसली. या इनोव्हा कारच संशय आल्याने पोलिसांनी गाडी चालकास आवाज दिला. मात्र, चालकाने गाडी सुरू करत दिघंचीकडे सुसाट वेगाने धान घेतली. पाठलाग करून इनोव्हा कार ताब्यात घेतली - पोलिसांनी त्याचा पाठलाग करून ...पान २ वर...

# आश्रय ट्रस्ट संलग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्स च्या तर्फे जेष्ठ नागरिकांचा वाढदिवसानिमीत्ताने सत्कार











मुंबई : आश्रय ट्रस्ट संलग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फॉउंडेशन चे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने सोशल राईट्सचे उपसचिव संतोष चौधर यांनी अंधेरी साईवाडी येथे जेष्ठ नागरिकांचा जन्मदिवस सोहळा आयोजित केला होता . यावेळी अंधेरी महिला विभागाच्या समिती अध्यक्षा तुकाबाई चौधर यांनी सदर कार्यक्रमात अतिशय मेहनत घेऊन ७४ जेष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा केला. या सर्वांचा जून व जुलै मध्ये वाढदिवस असतो. यावेळी संस्थेचे उप सचिव संतोष चौधर यांची मुलगी मानसी संतोष चौधर हिला एस एससी परिक्षेत ८५ टक्के गुण मिळून उत्तीर्ण झाल्याबद्दल निवृत्त पोलिस ऑफिसर पंढरीनाथ खंडागळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.व्यासपीठावर संस्थेच्या अध्यक्षा तुकाबाई चौधर, सल्लागार अनंत दाभोळकर, उप सचिव संतोष चौधर, निवृत्त पोलिस अधिकारी पंढरीनाथ खंडागळे, कोषाध्यक्ष किसन शेवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

--प्रास्ताविकपर भाषणात उप सचिव संतोष चौधर यांनी महाराष्ट नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस संदिप सिताराम दळवी यांनी साईनगर उद्यानात पायऱ्यांवर रॅलिंग बसवून दिले. त्यामुळे ज्येष्ठाना पायऱ्यांवर चढताना त्रास अथवा भिती वाटणार नाही. उद्यानातील फुटलेले पत्रे नवीन टाकून पावसाळ्यातील गैरसोय टाळली. त्याबद्दल त्यांचे आभार मानले.

संस्थेचे सल्लागार व साहित्यिक अनंत दाभोळकर म्हणाले की., देशात १२ कोटी ज्येष्ठ नागरिक आहेत. ४० टक्के एकाकी राहाणारे वृध्द आहेत. ५३ टक्के पती पत्नी वृध्द राहातात. असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. यासाठी मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून मुंबईतील पोलिस ठाण्याच्यावतीने विभागात ज्येष्ठांची माहिती घेण्यात येणार आहे.

- एकाकी व पतीपत्नी वृध्दांची चौकशी करून एका वहीत नोंद करून पोलिस ठाण्याचे अधिकारी वृध्दांच्या घरी भेटी देतील व शांतता कमिटीच्या मदतीने मदत करण्याच्या दृष्टीने संपर्क साधण्यात येणार आहे. असे सांगुन अनंत दाभोळकर म्हणाले की. अंधेरी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना अशा ज्येष्ठांची माहिती गोळा करण्यास शांतता कमिटीचे सदस्य सक्रिय असून त्यांना सहकार्य करावे असे आवाहन केले.

## नागपुरात नाल्याला आलेल्या पुरात आईसह मुलगी गेली वाहून; आईचा मृतदेह सापडला, मुलगी बेपत्ता



नागपूर : नागपूर शहरात रविवारी दमदार पावसाने हजेरी लावली. यामुळे शहरातील अनेक भागात पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. नागपूर शहराशेजारी असलेल्या हिंगणा येथील भीमनगर इसासनीच्या नाल्याला रात्री आलेल्या पुरात आई व मुलगी अशा दोघीही वाहून गेल्या. सुकवन राधेलाल मातरे (४२) आणि त्यांची १७ वर्षीय मुलगी अंजली राधेलाल मातरे असे वाहून गेलेल्यांचे नाव आहे. यापैकी सुकवन यांचा मृतदेह घराच्या काही अंतरावर आढळून आला आहे, तर त्यांची मुलगी अंजलीचा शोध घेतला जातो आहे. पूर्ण शहरात साचले होते पाणी : नागपुरात गेले तीन दिवस मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. रात्री दहा वाजताच्या सुमारास नागपूरच्या पडोळे चौकात रिंगरोडवर गुडघाभर पाणी साचल्यामुळे रस्त्याच्या एका बाजूची वाहतूक ( Nagpur traffic update ) बंद पडली. खोलगट भाग असल्याने पडोळे चौकातून प्रतापनगरच्या दिशेने जात असलेल्या रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी बंद झालातरुण धावले मदतीला - अनेक रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीचा खोळंबा निर्माण झाला. वाहन चालकांना अडचण येऊ नये म्हणून नागपुरातील अनेक नागरिक विशेषतः तरुण भर पावसात मदतीसाठी बाहेर पडल्याचे चित्र पहायला मिळाले. एका बाजूची वाहतूक बंद करत येणाऱ्या जाणाऱ्या वाहन धारकांना रस्ता दाखवत मार्ग काढून देण्याचे काम स्थानिक तरुणांनी रस्त्यावर उतरून केले. दरवर्षी पावसाळा सुरू झाल्यावर नागपुरातील रस्त्यांवर हेच चित्र बघायला मिळते. यंदाही या परिस्थितीत काहीही फरक पडलेला नाही.


पृष्ठ १ वरुन


### संपत्तीवरुन वाद, 22 वषीज़्य तरुणानं

घरात छाया पांचाळ रक्ताच्या थारोळयात गळा चिरलेल्या अवस्थेत मृत पडलेल्या आढळल्या. यावेळी पोलिसांना एक गुजराती भाषेत चिठ्ठी देखील आढळली. जी छाया यांचा मुलगा जय याने लिहिली होती.यात त्याने आपल्या आईची हत्या केल्याची कबुली दिली होती. त्यानंतर त्याने मुलुंड रेल्वे स्थानकात लोकल खाली उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.मात्र यात तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. वडिलोपार्जित प्रॉपर्टीवरुन हे दोघे माता-पुत्र डिप्रेशनमध्ये असल्याचे छाया यांच्या पतीने पोलिसांना सांगितले आहे. या प्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### सोलापुरात पन्नास लाखांचा गांजा जप्त

सदरचे वाहन पकडले. त्यातील चालकाकडे नाव विचारले असता त्याने संग्राम मलाप्पा पुजारी (रा. पुसेगाव भवानी नगर, ता. खटाव, जि. सातारा, मुळ रा. मारुती नगर, मुद्देबिहाळ, ता. मुद्देबिहाळ, जि. विजापुर, राज्य-कर्नाटक) असे नाव सांगीतले. त्याच्याकडे सदर वाहनामध्ये काय आहे याबाबत विचारपूस केली असता त्यामध्ये ०९ पोती असून त्यात गांजा असल्याचे पोलिसांना सांगितले.

इनोव्हा कार मध्ये गांजाची पाकीट आढळली - पोलीस इनोव्हा कारची झडती घेतली असता प्रत्येक पोत्यांमध्ये गांजाची पॅकेट्स आढळली. इसमाच्या ताब्यात सुमारे ४३ लाख ६६ हजार ४०० रुपये किमतीचा २१८ किलो गांजा तसेच 12 लाख रुपये किमतीची इनोव्हा कार, मोबाईल, इनोव्हा गाडीत मिळुन आलेल्या दोन वेगळया नंबरच्या नंबरप्लेट जप्त केल्या आहेत. याबाबत सांगोला पोलीस ठाणे येथे एनडीपीएस कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो. नि. अनंत कुलकर्णी हे करत आहेत.

गांजाचा तपास सुरू- संशयीत आरोपी संग्राम पुजारी याने सदर गांजा कोठुन आणला, तो कोणाला विक्री करणार होता. याबाबत माहिती घेतली जात असून अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी दिली. ही कारवाई सांगोला पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय कल्याण ढवणे, लिंबाजी पवार, विशाल लेंडवे, राहुल कोरे, मुजावर, गणेश कुलकर्णी, सुनिल लोंढे, संभाजी काशीद यांनी केली.

### मुंबई-नाशिक महामार्गावर स्कॉर्पिओ कारमधील

दिसली. संशय आल्यानं कारची तपासणी केली असता पोलीस पथकाला त्या गाडीत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. त्या व्यक्तीच्या डोक्याला बंदुकीची गोळी लागली होती. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. स्कॉर्पिओ कारमध्ये मृतदेह टाकून अज्ञात आरोपी मुंबई -नाशिक महामार्गच्या बाजूला एका झाडा खाली उभी करून कार सोडून पसार झाले होते..

चेक बुकमुळे पटली मृतदेहाची ओळख... दोन दिवसांपासून स्कॉर्पिओ कार मुंबई नाशिक महामार्गा लगत उभी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांकडून कारची तपासणी करण्या आली. स्कार्पिओ कारमध्ये मृत प्रफुल पवार याच्या नावानं चेकबुक आढळून आलं होतं. पोलिसांनी त्या दिशेनं तपास सुरु केला. मृत पवार हे वांद्रे परिसरात राहणारे असल्याचं समोर आलं. त्यानंतर मृत व्यक्तीच्या पत्नीचा पोलिसांना शोध घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, मृत प्रफुल्ल हे 1 जुलै रोजी घरातून स्कॉर्पिओ कारनं एका कार्यक्रमासाठी निघाले होते. मात्र त्यानंतर त्यांच्याशी कोणताच संर्पक झाला नसल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

मृत व्यक्तीच्या मोबाईल कॉल डेटा रेकॉर्डमुळे आरोपी जाळयात...

पत्नीनं दिलेल्या माहितीच्या आधारावर तपास करून मृत पवार यांचा मोबाईल कॉल डेटा रेकॉर्डच्या आधारे मुख्य आरोपी सरवणकर याला पोलिसांनी ताब्यात घेतलं. मात्र त्यानं सुरुवातीला पोलिसांचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर कसून चौकशीत त्यानंच मित्रांच्या साथीनं पवार यांची हत्या केल्याची कबुली दिल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार उपासे यांनी दिली आहे.

अन् हत्येचा रचला कट...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत पवार यांनी मुख्य आरोपी सरवणकर यांना 5 लाख रुपये दिले होते. तेच 5 लाख पवार यांनी परत देण्यासाठी आरोपी सरवणकरकडे तगादा लावला होता. मात्र आर्थिक अडचणींमुळे आरोपी सरवणकर 5 लाखांची परतफेड करू शकत नसल्यामुळं मृत पवारांनी त्याला शिवीगाळ केली आणि काही लोकांसमोर त्यांचा अपमानही केला. याच गोष्टीचा मनात राग धरून सरवणकरने आपल्या साथीदारांसह हत्येचा कट रचला.

आरोपींना 5 दिवसाची पोलीस कोठडी...

पोलिसांच्या प्राथमिक तपासात आरोपींनी पवार यांची 1 जुलै रोजी मुंबईत हत्या केल्याचं समोर आलं. तसेच त्यांचा मृतदेह त्यांच्या स्वतः च्या स्कार्पिओ कारमध्ये टाकला. त्यानंतर मुंबई - नाशिक महामार्गावर निर्जनस्थळी कार उभी करून तिन्ही आरोपी फरार झाले. तिन्ही अटक आरोपींना 7 जुलै रोजी न्यायालयात हजर केलं. 5 दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# माझ्या भावाच्या हत्येचा इव्हेंट करू नका - महेश कोल्हे

अमरावती - येथील उमेश कोल्हे हत्या प्रकरण देशपातळीवर गाजत आहे. सध्या या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) कडे आहे. या खून प्रकरणी दररोज नवनविन खुलासे होत आहेत. मात्र या साऱ्या प्रकरणात कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी येणाऱ्याकडून मनस्ताप होत असून, माझ्या भावाच्या हत्येचा इव्हेंट करू नका, अशी भावना महेश कोल्हे यांनी व्यक्त केली.

खुनाचा तपास एनआयएकडे (NIA) जाताच जिल्ह्याचे नाव देशातील चर्चेच्या केंद्रस्थानी आल्यामुळे कोल्हे कुटुंबियांकडे भेट देणाऱ्याची संख्या अचानकपणे वाढली. देशपातळीवरील नेत्यांपासुन, आमदार, खासदार एवढेच नव्हे तर, अभिनेत्यांनी सुद्धा हजेरी लावली आहे. माझा भाऊ उमेशला जाऊन आज १७ दिवस झाले आहेत. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अशातच काही संस्था, संघटना घरी येऊन आमच्याच भावाच्या श्रद्धांजली सभेचे निमंत्रण देऊन उपस्थित राहण्यासाठी आग्रह धरत आहे. यामुळे कुटुंबातील सर्वांनाच खूप त्रास, सहन करावा लागत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यापुढे श्रद्धांजली सभा, कार्यक्रम घ्या. पण, आम्हाला येण्याचा आग्रह करू नका. असे, आवाहन महेश कोल्हे यांनी केले.काय आहे प्रकरण - नुपूर शर्मा यांच्या समर्थनात पोस्ट शेअर केल्यामुळे अमरावती शहरातील औषधी व्यावसायिक उमेश कोल्हे यांची 21 जून रोजी रात्री साडेदहा वाजता घंटी घड्याळ परिसरात हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणात एकूण सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले



होते. या प्रकरणाचा तपास आता अमरावती पोलिसांकडून एएनआयकडे वर्ग करण्यात आला आहे. दरम्यान अमरावती शहरात एकूण तीन व्यक्तींना नुपूर शर्मा यांच्या समर्थनात पोस्ट शेअर केल्यामुळे धमकी मिळाली असल्याचे समोर आले आहे. एकाच व्यक्तीने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली आहे. रामपुरी कॅम्प परिसरातील या व्यक्तीला दिवसभर एका पोलिसाचे संरक्षण देण्यात आले. शुक्रवारी रात्री ही व्यक्ती आपल्या दुकानातून घरी पोहोचली असताना त्यांच्या घराची सहा जणांनी रेकी केल्याचे प्रकरण समोर आले आहे. त्यांच्या संरक्षणासाठी असणारा पोलीस कर्मचारी घरी जाण्यासाठी निघाला असताना त्याला एकूण सहा जण संशयित्रीच्या तक्रारदार व्यक्तीच्या घराच्या परिसरात दिसले. या सहाही व्यक्तींची हालचाल संशयास्पद असल्याचे, कळतात संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांनी याबाबत वरिष्ठांना सूचित केले. सात जणांना झाली होती अटक - एनआयए कडून आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपीमध्ये इरफान खान (32), मुदस्सर अहमद उर्फ सोनू रजा शेख इब्राहिम (22), शाहरुख पठाण उर्फ बादशाशा हिदायत खान (25), अब्दुल तौफिक उर्फ नानू शेख तस्लीम (24), शोएब खान उर्फ भुर्या साबीर खान (22), अतीब रशीद आदिल रशीद (22), युसूफ खान बहादूर खान (44) यांचा समावेश आहे.हत्येचा तपास एनआयएकडे - दरम्यान, नुपूर शर्मा यांचे समर्थन केले म्हणून अमरावतीच्या मेडिकल व्यावासायिक असलेल्या उमेश कोल्हे यांची हत्या करण्यात आली होती. या हत्येचा मास्टरमाईंड असलेल्या इरफान शेख याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. इरफान शेख हा रहबर नावाची एक एनजीओ चालवतो. त्यानेच आरोपींना उमेश कोल्हे यांची हत्या करण्याचा आदेश दिला होता, हे समोर आले आहे. त्यानंतर आरोपींनी 21 जून रोजी उमेश कोल्हे यांची हत्या केली. प्रथमदर्शनी ही हत्या लूटपाट करण्याच्या उद्देशाने झाली असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. मात्र आज तब्बल 12 दिवसांच्या तापसानंतर अमरावती शहर पोलिसांनी ही हत्या नुपूर शर्मा यांच्या पोस्ट व्हायरल केल्यामुळेच झाली असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने कोल्हे यांच्या हत्येचा तपास एनआयएकडे सोपविण्यात आला आहे.

## चोरीची गाडी घेऊन चोरटे पाहुण्यांच्या भेटीला, पण पोहचले थेट तुरुंगात




सांगली : कधी-कधी चोरटे स्वतःहून पोलिसांच्या तावडीत सापडतात,असाच काहीसा प्रसंग आटपाडी तालुक्यातल्या पिंपरी खुर्द या ठिकाणी घडला आहे. एका चोरट्याने एक दुचाकी चोरली आणि त्यानंतर तो त्याच्या पाहुण्यांना भेटायला ज्या गावी गेला,त्या गावातल्या एका सेवानिवृत्त जवानाची ती गाडी निघाली, मग गावकऱ्यांनी चोरट्याला आणि गाडीलाही पकडलं,व थेट पोलिसांच्या ताब्यात दिलं.पोलिसांनी दोघांना बेड्या ठोकल्या.मात्र या दुचाकी चोरट्यांच्या बाबतीत घडलेल्या घटनेची तालुक्यात खुमदार चर्चा झाली. पिंपरी खुर्द येथील सेवा निवृत्त जवान बाबासाहेब गणपत काटे हे पंधरा दिवसांपूर्वी कामानिमित्त आपल्या दुचाकीवरून आटपाडी येथे गेले होते.यावेळी काटे यांनी आपली दुचाकी बसस्थानकात उभी केली. काही वेळाने चोरटाने त्यांची दुचाकी लंपास केली.याबाबत त्यांनी आटपाडी पोलीस ठाण्यात चोरीची फिर्याद दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी गाडीचा शोध घेतला,पण गाडीचा शोध लागला नाही.पण चोरीला गेलेली गाडी चोरट्यांनी थेट गावात आणुन दिली. ज्या चोरट्याने गाडी चोरली होती, त्याचे पाहुणे पिंपरी खुर्द याठिकाणी राहतात, पाहुण्यांना भेटायला चोरटे काटे यांच्या गाडीवरून गावात पोहचले,गाडी गावात पोहचताच काटे यांची ही गाडी गावात प्रसिध्द असल्याचे अनेकांनी ती पटकन ओळखली. तसेच काटे यांना माहिती मिळताच ते देखील तेथे पोहचले.आणि गाडी बाबत चौकशी सुरू केली. चोरट्यांना आपली चोरी पकडल्याचे लक्षात येताच एका चोराने जवळ असणाऱ्या डाळिंब बागेत पळून जाऊन लपून बसला.तर एकाला ग्रामस्थांनी पकडले,आणि पोलिसांनी याची माहिती देताच आटपाडी पोलिसांनी तातडीने हजर होऊन लपून बसलेल्या चोरट्यासह दोघा चोरट्यांना अटक केले आहे.

## धक्कादायक! अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार ; व्हिडीओ व्हायरल करण्याची दिली धमकी

जळगाव : एका अल्पवयीन मुलीसोबत बळजबरीने शरीर संबंध प्रस्थापित करताना काढलेला आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर दोघांनी अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार जामनेर तालुक्यात घडला आहे. याप्रकरणी त्या दोन नराधमांसह त्यांना मदत करणाऱ्या इतर दोन अशा चौघांविरुद्ध मंगळवारी जामनेर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात पोलीसात दाखल तक्रारीनुसार, एका १७ वर्षांच्या मुलीला जळगाव तालुक्यातील तोरनाळा येथील आकाश सुरेश मुरळकर याने २ एप्रिल रोजी धमकावून बळजबरीने शरीरसंबंध प्रस्थापित केले होते. यावेळी त्याने शरीरसंबंधाचे व्हिडीओ चित्रीकरण देखील केले होते. यानंतर आकाशचा मित्र तुषार सोन्नी ( रा. चिंचोली पिंप्री, ता. जामनेर ) याने १२ जून २०२२ रोजी बुलढाणा येथील एका



कॅफेमध्ये पीडीत मुलीवर अत्याचार केला. यावेळी तुषारने देखील व्हिडीओ बनवून तो व्हायरल करण्याची धमकी पीडित मुलीला दिली. यानंतर पीडीत मुलीला व्हिडीओ व्हायरलची धमकी देत तिला ब्लॅकमेलींग करणे सुरू होते. शेवटी पीडीत तरुणीने पोलिसात तक्रार दिली. या प्रकरणी आकाश सुरेश मुरळकर ( रा. तोरनाळा ) आणि तुषार सोन्नी ( रा. चिंचोली पिंप्री, ता. जामनेर) या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणात या दोन आरोपींना आणखी दोघांनी मदत केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे

विशेष म्हणजे यात एका तरुणीचाही समावेश आहे. तसेच जामनेर येथीलच योगेश लोणारी याच्या विरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चौघांविरुद्ध विरुद्ध बळजबरीने शरीरसंबंध ठेवणे, पोक्सो कायदा, तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ३ (१) (आर); ३ (१) (एस) अंतर्गत जामनेर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धमकी मिळालेल्या तक्रारदाराच्या घराची रेकी; अमरावती पोलीस सतर्क

अमरावती - अमरावती शहरात एकूण तीन व्यक्तींना नुपूर शर्मा यांच्या समर्थनात पोस्ट शेअर केल्यामुळे धमकी मिळाली असल्याचे समोर आले असून एकाच व्यक्तीने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली आहे. त्यावर आता त्याच्या घराची सहा जणांकडून रेकी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे शहरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.काय आहे प्रकरण - नुपूर शर्मा यांच्या समर्थनात पोस्ट शेअर केल्यामुळे अमरावती शहरातील औषधी व्यावसायिक उमेश कोल्हे यांची 21 जून रोजी रात्री साडेदहा वाजता घंटी घड्याळ परिसरात हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणात एकूण सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या प्रकरणाचा तपास आता अमरावती पोलिसांकडून एएनआयकडे वर्ग करण्यात आला आहे. दरम्यान अमरावती शहरात एकूण तीन व्यक्तींना नुपूर शर्मा यांच्या समर्थनात पोस्ट शेअर केल्यामुळे धमकी मिळाली असल्याचे समोर आले आहे. एकाच व्यक्तीने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली आहे. रामपुरी कॅम्प परिसरातील या व्यक्तीला दिवसभर एका पोलिसाचे संरक्षण देण्यात आले. शुक्रवारी रात्री ही व्यक्ती आपल्या दुकानातून घरी पोहोचली असताना त्यांच्या घराची सहा जणांनी रेकी केल्याचे प्रकरण समोर आले आहे. त्यांच्या संरक्षणासाठी असणारा पोलीस कर्मचारी घरी जाण्यासाठी निघाला असताना त्याला एकूण सहा जण संशयित्रीच्या तक्रारदार व्यक्तीच्या घराच्या परिसरात दिसले. या सहाही व्यक्तींची हालचाल संशयास्पद असल्याचे, कळतात संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांनी याबाबत वरिष्ठांना सूचित केले. पोलिसांनी प्रकरण घेतले गांभीर्याने - नुपूर शर्मा यांच्या समर्थन केल्यामुळे धमकी मिळालेल्या व्यक्तीने पोलिसात तक्रार दिली असताना त्याच्या घराची रेकी करण्यात आल्यामुळे पोलिसांनी हे संपूर्ण प्रकरण अतिशय गांभीर्याने घेतले आहे. गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संबंधित व्यक्तीचे घर असून शुक्रवारी रात्री पोलीस उपायुक्त मकानदार, सहाय्यक पोलीस आयुक्त पूनम पाटील यांच्यासह गाडगे नगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक चोरमले यांनी बऱ्याच उशिरापर्यंत संशयित सहा जण कोण आहेत याचा तपास केला. तक्रारदार व्यक्तीच्या घरालगत असणारे सीसीटीव्ही कॅमेरा देखील पोलीस तपासून पाहत आहे. शनिवारी सुद्धा दिवसभर पोलीस उपायुक्त मकानदार, सहायक पोलीस आयुक्त पूनम पाटील हे गाडगे नगर पोलीस ठाण्यात ठाण मांडून होते.


**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

**Public Works Department**

**Indira Gandhi Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg, Bhaindar (W) 401101, Tal. Dis – Thane, 28192828**

**No.MNP/ PWD / Tender/ 319 / 2022-23** **Date - 11 / 7 / 2022**

**// Tender Notice No. 319 //**

Mira Bhaindar Municipal Corporation invites Sealed tenders for Appointment of experienced consultant for preparation of Detailed project report the works of installation of flap gates, Dewatering pumps etc. at various locations in Mira Bhaindar Municipal Corporation area including Preparation of proposals and to obtain permissions from authorities such as MCZMA, MOEF, Forest Department, Khari Bhumi etc. and also providing Project Management Consultancy services during the execution of work in the form of e-tendering. The Tender documents are available on MBMC website **https://mahatenders.gov.in** from **15/07/2022** to **28/07/2022** up to **12.00 PM** & submit the tender dully filled on **https://mahatenders.gov.in** Submission date **29/07/2022** up to **12.00 PM** hrs.

Ref.: MBMC / PRO / 149 / 2022-23
Date : 11 / 7 / 2022

Sign/-
Executive Engineer (PWD)
Mira Bhaindar Municipal Corporation

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार १२ ते १८ जुलै - २०२२

संपादकीय...



# ध्रुवीकरण ते तृप्तीकरण

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारतीय जनता पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी मुस्लिम समाजातील वंचित, मागास घटकांवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत केली. 'तुमच्याशिवाय'च्या ऐवजी 'तुमच्यासह'कडे जाण्याची ही दिशा स्वीकारण्यामागे अर्थातच राजकीय व्यूहरचना आहे.हैदराबादमध्ये भारतीय जनता पक्षाच्या (भाजप)राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी मागासलेल्या मुस्लिमांवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना केली. एवढेच नव्हे तर तुष्टीकरणाऐवजी आता तृप्तीकरणावर भर राहील, असेही विधान केले. पंतप्रधान जेव्हा जाहीरपणे बोलतात (भले तो पक्षाचा कार्यक्रम असला तरीही) तेव्हा ते सरकारचे धोरण असते.

तुष्टीकरणाकडून तृप्तीकरणाकडे होणारी वाटचाल ही लांगूलचालन करण्याऐवजी मुस्लिमांच्या मूलभूत समस्या सोडविण्याकडे वाटचाल असेल,हा पंतप्रधानांच्या बोलण्याचा सरळसरळ अर्थ निघतो; परंतु तुष्टीकरण आणि तृप्तीकरण यामध्ये ध्रुवीकरणाचाही मुद्दा हा महत्त्वाचा आहे आणि आजच्या स्थितीत देशात तोच प्रभावी आहे.

अलीकडच्या घटना पाहता ध्रुवीकरणाचे राजकारण भाजपला अनुकूल ठरले आहे. नुपूर शर्मा प्रकरणानंतर मात्र त्याच्या परिणामांची जाणीव झाली असावी. याचे कारण आता सत्ताधाऱ्यांनी मागासलेल्या मुस्लिमांवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे. मात्र खालपर्यंत झिरपलेले ध्रुवीकरण समाजात असुरक्षितता वाढविणारे आणि समाजमनाची विभागणी करणारे आहे, या समस्येचे काय? ते आव्हान मोठे आहे. अलिकडच्या सर्वच निवडणुकांतील प्रचार ध्रुवीकरणाधारे झाल्याचे दिसते. उत्तर प्रदेशात तर कट्टर हिंदुत्वाच्या मुद्द्यावरच भाजपने निवडणूक लढली होती. ८० विरुद्ध २० टक्के हा प्रचाराचा मुख्य मुद्दा होता. एवढेच नव्हे तर एकही मुस्लिम उमेदवार उभा केला नव्हता. आता तिथे दुसऱ्यांदा सत्ता ताब्यात आल्यानंतर ती दीर्घकाळ टिकविण्यासाठी आपली स्वीकारार्हता वाढविण्याचा हा प्रयत्न म्हणजेच तेथे मोठ्या प्रमाणात असलेल्या 'पसमांदा' मुस्लिमांना चुचकारण्याचा प्रयत्न आहे. 'पसमांदा'चा फारशीतील अर्थ पिछाडीवर असलेले किंवा मागासलेले. जसे हिंदूंमध्ये जातिसमूह आहेत. तसेच जातिसमूह मुस्लिमांमध्येही आहेत. काका कालेलकर आयोग असो, मंडलल आयोग असो किंवा त्यानंतरचे सच्चर समिती किंवा रंगनाथ मिश्रा आयोग असोत, या सर्वांनी मुस्लिमांमधील जाती आणि त्यांचे मागासलेपण अधोरेखित करताना त्यांच्या प्रगतीसाठी सरकारने काही तरी करावे, अशा शिफारशी केल्या आहेत.

भारतीय मुस्लिमांची 'अशरफीया' आणि 'पसमांदा' अशी दोन वर्गात विभागणी होते. अशरफीया हे अरबस्तान, मध्य आशिया, अफगाणिस्तानातून आलेले आणि स्वतःला उच्च समजणारे मुस्लिम आहेत. स्वातंत्र्यानंतरही मुस्लिमांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील नेतृत्व याच वर्गाकडे राहिले आहे. परंतु त्यांचे प्रमाण २० टक्के आहे. इस्लामी राजवटीच्या काळात दलित, मागासवर्गातून धर्मांतरित झालेले 'पसमांदा' मानले जातात. त्यांची संख्या देशातील एकूण मुस्लिमांमध्ये ८० टक्क्यांच्या आसपास आहे. यात सुन्नी मुस्लिमांचे प्राबल्य आहे. तरीही राजकीय तसेच आर्थिक हक्कांमध्ये 'पसमांदा मुस्लिमां'चा हिस्सा अत्यल्प राहिला आहे.

मुस्लिमांमधील वरच्या श्रेणीतील लोक किंवा 'मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड' किंवा इतर संघटना आहेत त्यांना खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक म्हणता येईल का, हा प्रश्नच आहे. मुस्लिम समाजाकडे मतपेढी म्हणून पाहिले गेले आणि या शब्दच्छलात मागासलेल्यांच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक अधिकारांबद्दलची चर्चा मागे पडली. नेमकी हीच बाब हेरून '८०-२०' चे गणित आपल्या पद्धतीने मांडून मागासलेल्या समुहाशी जवळीक साधण्याचे गणित भाजपने आखले आहे.

उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, राजस्थान, केरळ, मध्यप्रदेश या राज्यांमध्ये त्यातही उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल या लोकसभेमध्ये १६० हून अधिक खासदार पाठविणाऱ्या राज्यांमध्ये या 'पसमांदा' मुस्लिमांचे प्रमाण मोठे आहे. कॉंग्रेसवर तुष्टीकरणाचा आरोप करणाऱ्या भाजपने आता हिंदू मतपेढीसोबतच आपलीही वेगळी मुस्लिम मतपेढी बांधण्याची तयारी चालविली आहे. देशातील २० कोटी मुस्लिम लोकसंख्येमधील बहुसंख्य मतदार भाजपबरोबर नाहीत, याची जाणीव सत्ताधाऱ्यांना आहे. ही मतपेढी काही प्रमाणात काँग्रेसकडे आणि राज्यनिहाय प्रादेशिक पक्षांकडे आहे.

# स्वागतार्ह दरवाढ!

राज्यास भारनियमनापासून वाचवण्यासाठी 'महावितरण'ने महाग वीज खरेदी केल्यामुळे काही काळ देयकेही वाढणार, त्यात राजकीय आडकाठी नसणे योग्यच.. शेतकऱ्यांस पुढे करीत वीज दरांचे राजकारण केले जाते. वास्तविक शेतमालाला रास्त, किफायती भाव ही शेतकऱ्यांची अपेक्षा असते.. एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या पहिल्या काही दिवसांतच इंधन समायोजन निमित्ताने वीज दरवाढ मार्गी लागली, याचे मन:पूर्वक स्वागत. हा या सरकारचा प्रशासकीय निर्णय नसला, तरी सरकारने यात आडकाठी केली नाही हे महत्त्वाचे. याआधी शपथविधीनंतर या दोघांनीही पेट्रोल-डिझेलवरील मूल्यवर्धित कर कमी करण्याचा इरादा व्यक्त केला. पण तो अद्याप फक्त इरादा आहे आणि त्याचे प्रत्यक्ष निर्णयात रूपांतर व्हायचे आहे. त्याआधीच वीज नियामक आयोगाने वीज दरवाढीची मुभा 'महावितरण'ला दिली आहे. ती का स्वागतार्ह आहे याचे संख्याधारित स्पष्टीकरण करण्याआधी या निर्णयामागील कार्यकारणभावदेखील समजून घ्यायला हवा. तोदेखील तितकाच महत्त्वाचा आणि म्हणून 'स्वागतार्ह' आहे. म्हणजे असे की राज्यात वीज वितरण करणाऱ्या कागदोपत्री स्वायत्त असणाऱ्या महावितरण कंपनीस कडेलोटाच्या उंबरठ्यावर नेण्यास याआधीचे फडणवीस सरकार आणि त्या सरकारात मंत्री असलेले शिंदे हे जबाबदार आहेत. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवावे त्याप्रमाणे तत्कालीन ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांना थकबाकीचे पैसे भरले नाही तरी चालेल, वीज तोडली जाणार नाही, असा जाहीर दिलासा दिला. तेव्हापासून महावितरण दिवसागणिक गर्तेत जाऊ लागली. तेव्हा एके काळच्या समृद्ध राज्य वीज महामंडळातून निर्माण झालेल्या या महावितरण कंपनीस वाचवायचे असेल तर वीज दरवाढीस पर्याय नाही. असा दरवाढीचा प्रस्ताव मागील उद्धव ठाकरे सरकारच्या काळातच सादर झाला. त्याही सरकारात शिंदे होते. पण त्या वेळी विरोधी पक्षातील भाजपने कडवा विरोध केला. आता तो भाजप सरकारात आहे आणि शिंदे हे त्याचे



मुख्यमंत्री. तेव्हा या वीज दरवाढीच्या निर्णयाची जबाबदारी घेऊन खमकेपणाने ते महावितरणच्या पाठीशी उभे राहतील, ही अपेक्षा.

आता या निर्णयामागील आर्थिक वास्तवाविषयी. गेले दोन महिने देशाने- म्हणून राज्यानेही- अभूतपूर्व उन्हाळा अनुभवला. एरवी अशा उन्हाळ्यात विजेचे भारनियमन सर्रास होत असते. देशात प्रगतिपथावर जोरदार घोडदौड करणाऱ्या गुजरातपासून कुथतमाथत उभ्या असलेल्या बिहापर्यंत सर्वत्र भारनियमन झाले. पण महाराष्ट्रात सुरुवातीच्या काळातील आकस्मिक अंधार वगळता या वीजटंचाईची झळ फार बसली नाही. याचे कारण देशात मिळेल तेथून वीज खरेदी करण्याचा महावितरणचा रास्त निर्णय. ही वीज अर्थातच महाग होती. त्यामुळे त्यासाठी खर्च केलेल्या रकमेची वसुली करणे आले. अन्य वीज कंपन्यांची वीज महाग असण्याचे कारण म्हणजे कोळशाच्या दरांत झालेली वाढ. म्हणून ही वसुली म्हणजे इंधन समायोजन. ते पुढील पाच महिने सुरू राहील. म्हणजे ही दरवाढ हंगामी असेल. वरवर पाहता यात विशेष काही नाही. हेच पाच महिने शेतीच्या हंगामाचे. चांगला पाऊस झाला तर या काळात शेतकऱ्यांस पाणी खेचून आणावे लागत नाही. म्हणजे त्या क्षेत्राची मागणी कमी होते. पण तरीही शेतकऱ्यांच्या कमाईच्या काळात त्यांच्या संभाव्य उत्पन्नास कात्री लागेल म्हणून त्यांच्या नावे राजकारण करणारे या दरवाढीविरुद्ध गळा काढणारच नाहीत असे नाही. वास्तविक कोणाही शेतकऱ्याचे म्हणणे आम्हास मोफत वा स्वस्त वीज हवी असे कधीच नसते. त्यांच्या शेतमालास रास्त दर मिळावा हीच त्यांची वास्तव अपेक्षा. पण ती पूर्ण करण्याची इच्छा, हिंमत आणि कुवत नसल्याने त्यांच्या नावे स्वस्त वा मोफत दरवाढीचे राजकारण केले जाते. त्यातूनच वीज बिलमाफीसारख्या सवंग घोषणा होतात आणि महावितरण खड्ड्यात जाते. अशा मोफत वीज घोषणा करण्यासही हरकत नाही. त्या करणाऱ्यांनी अर्थसंकल्पातून महावितरणास आवश्यक ती नुकसानभरपाई द्यायला हवी. पण ते करण्याची आर्थिक ऐपत नाही. म्हणून महावितरणच्या नावे सर्रास दौलतजादा सुरू राहतो.

शेतकऱ्यांच्या या कथित बिलमाफीची किंमत त्यामुळे अन्य ग्राहकांस चुकवावी लागते. यातून वीज थकबाकीचा राक्षस समोर ठाकला असून तो अखेर महावितरणचाच घास घेणार हे नक्की. तसा तो घेतला जाऊन ही सरकारी यंत्रणा कोणा सरकारधार्जिण्या खासगी उद्योगपतीची धन होण्यापासून वाचवायचे असेल दरवसुली अपरिहार्य. तिचे महत्त्व पुढील तपशील पाहिल्यास ध्यानात येईल. राज्यात महावितरणची एकूण ग्राहकसंख्या २ कोटी ८७ लाख. एकूण थकबाकी ७३ हजार ८७९ कोटी रुपयांची तर एकूण कर्ज सुमारे ४५ हजार ४४० कोटी रु. इतके. याचा अर्थ महावितरण या कंपनीच्या डोक्यावरील एकूण आर्थिक बोजा १ लाख १९ हजार २२९ कोटी रु. इतका महाप्रचंड. या भयानक वीज बिल थकबाकीतील सर्वाधिक ४९ हजार ५७५ कोटी रुपये इतकी रक्कम ही कृषिपंपांची थकबाकी. याचा अर्थ निम्म्यापेक्षा अधिक थकबाकी आहे ती कृषिपंपधारकांकडे. यावर साधा प्रश्न असा की ही थकबाकी इतकी वाढतेच का? त्याचे उत्तर वीज बिलमाफीच्या राजकारणात आहे. सध्या या प्रगत आदी राज्यातून कृषी वीज बिलवसुली होते अवघी ३.१ टक्के इतकीच. महाराष्ट्रात २०१४ साली भाजप-सेना सरकार सत्तेवर आले तेव्हा कृषिपंपांची वीज बिल थकबाकी ११ हजार ५६२ कोटी रु. इतकीच होती. त्यानंतर पाच वर्षांनी २०१९-२० मध्ये सेना-राष्ट्रवादी- काँग्रेस सत्तारूढ होईस्तोवर ही थकबाकी ४० हजार २९१ कोटी रुपयांवर गेली होती. म्हणजेच २०१४ ते २०१९ या काळात प्रतिवर्ष सुमारे ९०-१०० टक्के या गतीने तीत ४०० टक्क्यांची वाढ झाली. तीमागे होती शेतकऱ्यांनी वीज बिल भरले नाही तरी आम्ही त्यांचा वीजपुरवठा तोडणार नाही, ही तत्कालीन भाजप सरकारची घोषणा. त्यामुळे जे बिले भरत होते त्यांच्या संख्येतही घट झाली. उद्धव ठाकरे सरकार स्थिरस्थावर व्हायच्या आत करोनाकाळ अवतरला. करोनापूर्व काळात २०१९-२० मध्ये महावितरणचा खर्च व महसूल यांतील वार्षिक तूट जेमतेम ७५२८ कोटी रुपये होती. ती करोनाच्या काळात २०२०-२१ मध्ये १२ हजार ५२३ कोटी रुपयांवर गेली. याचा अर्थ तीत सुमारे ६० ते ७० टक्के वाढ झाली. म्हणजे वसुली नाहीच; वर होता तोही महसूल गेला. खायला मिळत नसतानाच अतिसाराने गाठावे असे. यातून वीज मंडळ सावरायच्या आत यंदा कडकडीत उन्हाळ्याने विक्रमी वीज मागणी अनुभवली. मुंबईसारख्या शहरात तर यंदा तापमानाने पस्तिशी ओलांडली. महाराष्ट्र आज निम्म्यापेक्षा अधिक शहरी आहे आणि शहरांत वीजवापरही अधिक असतो. एके काळी श्रीमंतीचे एकक असलेले वातानुकूलन आज शहरांतील निम्न आर्थिक स्तरांतील वस्त्यांतूनही सर्रास दिसून येते. या सर्वास वीज लागते. म्हणूनच प्रसंगी १४ रु. प्रतियुनिट इतक्या विक्रमी महाग दरात ती खरेदी केली गेली. त्यास पर्याय नव्हता. त्यामुळे या खर्चाच्या वसुलीसही तो नाही. त्यामुळेच या दरवाढीचे स्वागत.

ते करताना वीज ग्राहकांतील दर तफावतीचा मुद्दाही विचारात घेणे आवश्यक ठरते. शेतकऱ्यांस 'परवडत' नाही या नावाने त्यास पुढे करीत वीज दर राजकारणात शेतीसाठी अत्यंत स्वस्त दरांत वीज दिली जाते. सर्वसामान्य ग्राहक प्रति युनिट पैसे मोजतो तर कृषिपंपाची दर आकारणी पंपांच्या अश्वशक्ती क्षमतेवर होते. म्हणजे वीज दर आकारणी प्रत्यक्ष वापरावर होत नाही. ती पंपाच्या क्षमतेवर होते आणि ही क्षमता 'कमी' दिसेल अशी व्यवस्था सर्वत्र उपलब्ध असल्याने प्रत्यक्षात बिलवसुली आणखीच ढासळते. याचा अर्थ केवळ समायोजन आकाराची वसुली करून चालणारे नाही. ती व्हायला हवीच. पण त्याच्याबरोबर रीतसर वीज दरवाढही व्हायला हवी आणि त्याची वसुली न थांबवण्याचे धैर्यही हवे. शिंदे-फडणवीस सरकारकडे धैर्याची कमतरता नाही. राजकीय आघाडीवर ते दिसलेच. त्या धैर्याचा काही अंश आर्थिक आघाडीवरही दिसायला हवा. ताजी वीज दरवाढ ही त्याची सुरुवात असेल ही आशा. म्हणून तिचे स्वागत.

• • •

# ठाणे आयुक्तालय क्षेत्रातील मनाई आदेशात वाढ



ठाणे - ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात २३ जुलै पर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. या अंतर्गत सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे तसेच पाच किंवा पाचहून अधिक लोकांनी एकत्र जमणे, विनापरवानगी जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे या कृत्यांना मज्जाव घालण्यात आला आहे. ठाणे शहर पोलिसांनी हे आदेश लागू केले आहेत. मागील महिन्यात राज्यात झालेल्या राजकीय घडामोडींमुळे ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी ८ जुलै पर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आले होते. यात वाढ झाली असून ठाणे शहर विशेष शाखेचे पोलीस उप आयुक्त डॉ. सुधाकर पठारे यांनी २३ जुलै पर्यंत हे मनाई आदेश लागू केले आहेत. या कालावधीत नागरिकांनी तलवारी, भाले, दंड, बंदुका, लाठ्या, स्फोटक पदार्थ किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तु बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, पाच किंवा पाचापेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्यांना देखील मनाई करण्यात आली आहे. परंतु, लग्न कार्यासाठी जमलेले लोक, प्रेत यात्रा आणि अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका, सरकारी कार्यालय, न्यायालय, सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेले नागरिकांबरोबर पोलीस आयुक्त आणि त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा, मिरवणुका यांना हे आदेश लागू राहणार नाही. तसेच हे मनाई आदेश मोडणाऱ्या नागरिकां विरुद्ध कारवाई करण्यात येणार असल्याचे ठाणे शहर पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# ठाण्यात 74 पैकी 29 अतिधोकादायक इमारतीच रिकाम्या

ठाणे : संपुर्ण महापालिका क्षेत्रामध्ये एकूण ४ हजार ३९७ धोकादायक इमारती असल्याची यादी जाहीर करत त्यात ७४ इमारती अतिधोकादायक असल्याचे स्पष्ट केले होते. या अतिधोकादायक इमारती पावसाळ्यात कोसळून दुर्घटना घडू नये यासाठी प्रशासनाने या इमारतीमधील रहिवाशांना इतरत्र स्थलांतरीत होण्याची नोटीस बजावून अशा इमारती पाडण्याचे काम हाती घेतले होते. प्रत्यक्षात आतापर्यंत २९ इमारतीच रिकाम्या करण्यात आल्या असून उर्वरित इमारतींमध्ये आजही रहिवाशी जीव मुठीत घेऊन राहत असल्याची बाब समोर आली आहे. मालकासोबत असलेला जागेचा वाद तसेच इतर विविध कारणांमुळे हे नागरिक घरे रिकामी करण्यास तयार होत असल्याचे पालिका सुत्रांकडून सांगण्यात आले. ठाणे, वागळे इस्टेट, कळवा आणि मुंब्रा या भागात मोठ्या प्रमाणात बेकायदा इमारती आहेत. त्याचबरोबर नौपाडा परिसरातील जुन्या अधिकृत इमारती मोडकळीस आल्या आहेत. अशा इमारती पावसाळ्यात कोसळून त्यात जीवितहानी होण्याचे प्रकार गेल्या काही वर्षांपासून घडत आहेत. अशा घटना टाळण्यासाठी



महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी शहरातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून यादी तयार करण्यात येते. सी-१, सी-२ए , सी२बी आणि सी३ अशा चार टप्प्यांत धोकादायक इमारतींचे वर्गीकरण करण्यात येते. अशाचप्रकारे पालिका प्रशासनाने यंदाही शहरातील धोकायदायक इमारतींची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये संपुर्ण शहरात ४ हजार ३९७ धोकादायक इमारती असून त्यात सुरूवातीला ६७ इमारती सी-१ म्हणजेच अतिधोकादाक असल्याचे समोर आले होते. त्यानंतर पालिका प्रशासनाने पुन्हा केलेल्या सर्वेक्षणात अतिधोकादायक इमारतींची संख्या वाढली असून अशा इमारतींची संख्या आता ७४ इतकी झाली आहे.

सी-१ म्हणजेच अति धोकादायक इमारती पावसाळ्यात पडून जिवीतहानी होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन अशा इमारतींचे बांधकाम पाडण्यात येतात. यंदाही पालिकेने ७४ अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना नोटीस बजावून सदनिका रिकाम्या करण्यास सांगितले होते.

तसेच रिकाम्या झालेल्या इमारतींचे बांधकाम पाडण्याचे कामही पालिकेने सुरु केले होते. त्यामध्ये आतापर्यंत २९ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत, तर, दोन इमारतींचे बांधकाम पाडण्यात आले आहे. ४३ इमारतींमध्ये रिकाम्या करण्यात आलेल्या नाहीत.

त्यामध्ये १६ इमारती या कोपरी येथील दौलतनगर भागातील असून त्याठिकाणी १८७ कुटूंब राहतात. या इमारतींच्या पुर्नविकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. तळ मजल्याच्या १० तर, तळ अधिक एक मजल्याच्या १७ सदनिका आहेत. या सर्वच ठिकाणी २२० कुटूंब राहतात, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली. या संदर्भात पालिका अतिक्रमण विभागाचे उपायुक्त जी.जी.गोदेपुरे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा दिला.

मालकासोबत असलेला जागेचा वाद तसेच इतर विविध कारणांमुळे हे नागरिक घरे रिकामी करण्यास तयार होत नाहीत. असे असले तरी या इमारती रिकाम्या करण्याचे काम पालिकेकडून सुरुच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## बहुप्रतिक्षित मुरबाड रेल्वेला गती मिळणार; प्रकल्पाच्या 50 टक्के खर्चाची राज्य सरकारकडून हमी

बहुप्रतिक्षित टिटवाळा-मुरबाड रेल्वेमार्गाच्या खर्चात राज्य सरकारकडून ५० टक्के खर्च उचलण्यात येणार आहे. केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या विनंतीवरून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारमार्फत रेल्वे मंत्रालयाकडे ५० टक्के खर्चाच्या हमीचा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश आज (सोमवार) दिले. त्यामुळे या टिटवाळा मुरबाड रेल्वे मार्गाच्या प्रकल्पाला गती मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.ठाणे जिल्ह्यातील मुरबाड आणि कल्याण तालुक्यातील मोठा भाग आजही रेल्वे मार्गाने जोडला गेला नसल्याने विकासापासून दूर राहिला आहे. त्यामुळे टिटवाळा किंवा उल्हासनगरपासून रेल्वेमार्ग मुरबाड तालुक्यातील गावांना जोडावा अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून आहे. या मार्गामुळे कल्याण तालुक्यातील अनेक गावेही जोडली जातील. त्या गावांना विकासाच्या प्रवाहात आणता येईल. यासाठी मुरबाडपर्यंत रेल्वेची अनेक वर्षांपासून मागणी केली जात होती.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी या मार्गाला मंजुरी देण्यात आली. केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी यासाठी प्रयत्न केले. मात्र यावर पुढे ठोस काहीही झाले नव्हते. या प्रकल्पाच्या कामात



राज्य सरकारने ५० टक्के वाटा उचलावा, अशी मागणी २०१९ मध्ये कपिल पाटील यांनी केली होती. त्याला तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली होती. मात्र, गेल्या अडीच वर्षांपासून हा प्रस्ताव रखडला होता. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी मुंबईत आज भेट घेतली. यावेळी नियोजित रेल्वेच्या कामासाठी राज्य सरकारकडून ५० टक्के निधी देण्याची विनंती करण्यात आली. मुरबाड तालुक्याच्या विकासासाठी रेल्वे अत्यावश्यक आहे. मुरबाडवासियांना रेल्वेसेवा देण्यास भाजपा कटीबद्ध आहे, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुरबाड रेल्वेमार्गाच्या खर्चात ५० टक्के वाटा उचलण्यासंदर्भात हमी देण्याबाबत रेल्वे मंत्रालयाकडे प्रस्ताव तातडीने पाठविण्याच्या सुचनाबसंबंधित अधिकाऱ्यांना दिल्या, अशी माहिती कपिल पाटील यांनी दिली.या निर्णयामुळे नियोजित मुरबाड रेल्वेमार्गासाठी राज्य सरकारचा निधी मिळणार असल्यामुळे कामाला निश्चितच वेग येईल. मुरबाड तालुक्याच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतल्याबद्दल आभारी आहोत, अशी प्रतिक्रिया केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# सोन्याच्या व्यवसायातील नुकसान भरून काढण्यासाठी करायचा घरफोडी

## मानपाडा पोलिसांनी ठोकल्या बेड्या




मुंबई : घरफोडीच्या गुन्ह्यातील तीन सराईत चोरट्यांना मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. अभिजीत रॉय, इम्रान खान आणि रियाज खान अशी या तिन्ही चोरट्यांची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून 71 तोळे सोन्याचे आणि चांदीचे दागिने असा 36 लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजीत रॉय याचा सोने गाळण्याचा व्यवसाय होता. या व्यवसायात त्याला नुकसान झालं होतं. हे नुकसान भरून काढण्यासाठी त्याने घरफोडी करत सोने चोरण्याचा मार्ग अवलंबला. अभिजीत विरोधात या आधी मुंबई , मिरा भाईंदर, वसई, विरार परिसरात 13 घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

मानपाडा पोलिसांच्या हद्दीत दिवसा ढवळ्या घरपोडीचे प्रकार वाढले होते. या पार्श्वभूमीवर मानपाडा पोलिसांनी सीसीटिव्ही आणि तांत्रिक तपास करत आरोपींचा शोध सुरू केला. सीसीटिव्ही आणि तांत्रिक तपासाच्या आधारे अभिजीत रॉय याला अटक केली.

मुळचा पश्चिम बंगालचा असलेला अभिजित रॉय हा भायखळा परिसरातील कामाठीपुरा परिसरात राहतो. मुंबई वरून डोंबिवली आणि वसई विरार पर्यंत लोकलने प्रवास करत तो घराला कुलूप असलेले आणि फोडताना फारसे कष्ट घ्यावे लागणार नाह असे सुरक्षा रक्षक नसलेले घर निवडायचा. त्यानंतर कडी कोयंडा उचकटून घरफोडी करत असे. त्याच्याकडून मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सहा गुन्ह्यांची उकल करण्यात आली.

अटक केलेले इम्रान खान आणि रियाज खान यांची देखील गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. या दोघांकडून एक लाख 18 हजर रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या दोघांकडून मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चार गुन्हे उघडकीस आणले आहेत. हे दोघे एमआयडीसी मधील बंद कारखान्यातील छोट्या मोठ्या साहित्यची चोरी करून भंगारात विकून उपजीविका करत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

डोंबिवली पोलीस ठाण्याचे एसीपी सुनील कुराडे, मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे, एपीआय अविनाश वणवे, सुनील तारमळे आणि त्यांच्या पथकाने सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने आरोपीचा माग काढत दहा गुन्हे उघडकीस आणत तीन जणांना अटक केली.

# सेक्सटॉर्शनसाठी पत्नीचा वापर

## अधिकाऱ्याला मागितली एक कोटीची खंडणी, 28 लाख घेताना आरोपी रंगेहात पकडला

नागपूर - सेक्सटॉर्शनसाठी पत्नीचा ( use of wife for sexual abuse ) वापर करुन अधिकाऱ्याकडून एक कोटीची खंडणी मागणाऱ्या आरोपीच्या नागपूर पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. अमित सोनी असे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडलेल्या आरोपीचे नाव असून तो छत्तीसगडमधील राजनांदगावचा रहिवासी आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला 28 लाख रुपयाचा पहिला हप्ता घेताना सदर परिसरातील एका हॉटेलमधून रंगेहात पकडले आहे.

अधिकाऱ्याने महिलेला पाठवले अश्लील छायाचित्र - शहरातील एक अधिकारी अमित सोनी आणि त्याच्या पत्नीला ओळखतात. गेल्या दीड महिन्यांपासून त्यांची आरोपी अमितच्या पत्नीसोबत चॅट सुरू होती. यावेळी आरोपी अमित आणि त्याच्या पत्नीने पीडित अधिकाऱ्याला अश्लील छायाचित्रे आणि मॅसेज पाठविले. त्यानंतर त्या पीडित अधिकाऱ्यालाही अशाच प्रकारची छायाचित्रे आणि चित्रफीत पाठविण्यासाठी बाध्य केल्याचा अधिकाऱ्याचा दावा आहे. त्या अधिकाऱ्याने स्वतःचे काही अश्लील छायाचित्र महिलेच्या




मोबाईलवर पाठवले होते.१ कोटीची केली मागणी - अधिकारी आपल्या जाळ्यात अडकल्याची खात्री पटल्यानंतर अमितने त्या अधिकाऱ्याशी संपर्क साधला. तुमची अश्लील छायाचित्रे आणि चित्रफीत आमच्याकडे असून ती तुमच्या नातेवाइकांमध्ये व्हायरल करू अशी धमकी त्याने अधिकाऱ्याला दिली. ती व्हायरल न करण्यासाठी एक कोटीची खंडणीही मागितली. मात्र खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार ऐकून अधिकारी चक्रावून गेला.

२८ लाखांचा पहिला हफ्ता - १ कोटी रुपयांची एवढी मोठी रक्कम देण्यास संबंधित अधिकाऱ्याने असमर्थता दर्शविली. तेव्हा अमितने त्यानंतर अधिकाऱ्यांकडे ७० लाखांची मागणी केली. त्यापैकी पहिल्या हप्त्यात २८ लाख रुपये द्या, यावेळी तुम्हाला छायाचित्रे व चित्रफित देऊ असे अमित म्हणाला. आपल्याला छायाचित्र मिळतील त्यामुळे सदर अधिकाऱ्याने 28 लाखाचा पहिला हप्ता अमीतला देण्याचे ठरवले.अधिकाऱ्याने घेतली पोलीसात धाव - अधिकाऱ्याने पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्याकडे तक्रार केली. अमितेशकुमार यांनी गुन्हेशाखेला कारवाईचे निर्देश दिले. त्यानंतर अतिरिक्त पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, गुन्हेशाखेचे उपायुक्त चिन्मय पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीला नागपूरच्या सदर परिसरातील एका हॉटेलमध्ये सापळा रचला. यावेळी अमीतला २८ लाखांची रोख घेताना पोलिसांनी रंगेहात पकडून अटक केली आहे.

# सुन्न करणारी घटना! आईची हत्या करून मुलाचा आत्महत्येचा प्रयत्न




मुंबई : मुंबई- 22 वर्षीय मुलाने आपल्या 46 वर्षीय आईची धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या केली. ही घटना 9 जून रोजी सायंकाळी 6.30 च्या सुमारास मुलुंड येथील वर्धमान नगर परिसरात घडली आहे. छाया पांचाळ (वय 46 वर्षे) असे मृत महिलेचे नाव आहे आहे. वर्धमान परिसरातून शनिवारी सायंकाळी मालाड पोलिसांना फोन आला. एका रूममधून रक्त बाहेर येत असल्याचे पोलिसांना कळविण्यात आले होते. त्यानंतर मालाड पोलीस ताबडतोब घटनास्थळी दाखल झाले. तेव्हा त्यांना घरामध्ये रक्तबंबाळ अवस्थेत महिला दिसली. त्यानंतर महिलेला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी डॉक्टरांनी महिलेला मृत्यू घोषित केले. या घटनेची माहिती महिलेच्या पतीला देण्यात आली.

# फसव्या आणि बनावट वेबसाइटपासून सावध राहा

## मुंबई पोलिसांनी सांगितला मार्ग

सध्याचा आधुनिक काळ आहे. या काळात जगणं अधिक सोपं झालं आहे, असं म्हणावं लागेल. इंटरनेटमुळं (Internet) जग जवळ आलं आहे. तुम्ही जगाच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकावरील व्यक्तींशी काही सेकंदात संपर्क साधू शकता. अनेक गोष्टी घरबसल्या एका क्लिकवर सर्व गोष्टी करु शकता. पण या आधुनिकीकरणाचा तोटाही आहे. या सगळया सुविधांबरोबरच इंटरनेटच्या मदतीनं होणाऱ्या फसवणूक (Fruad) आणि गुन्ह्यांचं (Cyber Crime) प्रमाण वाढलं आहे. अलिकडच्या काळात सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणत वाढ झाल्याचं दिसून येत आहे.

सायबर गुन्हे करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. बनावट वेबसाइट बनवून नेटकऱ्यांची दिशाभूल




करण्याचं प्रमाणही वाढलं आहे. मुंबई पोलिसांनी नागरिकांना यासंदर्भात माहिती देत काळजी घेण्याचं आवाहन केलं आहे. यासाठी कोणती काळजी घ्याल, याबाबत पोलिसांनी सांगितलं आहे. सायबर फसवणूक टाळायची असल्यास अशा फसव्या आणि बनावट वेबसाइट ओळखता येणंही गरजेचं आहे. त्या कशा ओळखायच्या हे जाणून घ्या...

**फसव्या आणि बनावट वेबसाइट कशा ओळखाल?**

1. URL कडे लक्ष द्या. (Pay Close attention to URL)

फसव्या आणि बनावट वेबसाइट ओळखण्यासाठी आधी वेबसाईटच्या URL कडे लक्ष द्या. कोणत्याही नवीन वेबसाईटचा URL नीट तपासून पाहा. प्रत्येक वेबसाईटचा URL वेगळा असतो. फसव्या आणि बनावट वेबसाइटच्या URL मध्ये एखादं अक्षरं किंवा शब्द जास्त असतो.

2. वेबसाईटवर वैयक्तिक माहिती देताना कनेक्शन तपासा.

वेबसाईटवर वैयक्तिक माहिती देताना HTTP वेबसाईटवर विश्वास ठेऊ नका. सुरक्षिततेची हमी आहे ते तपासून पाहा.

3. ट्रस्ट सील तपासा.

अधिकृत वेबसाईटवर ट्रस्ट सील असतो. हा ट्रस्ट सील त्यांची अधिक वेबसाईट अधिकृत वेबसाईट ओळखण्यासाठी आवश्यक अधिकृत आणि बनावट वेबसाईटमधील फरक दाखवतात. हे ट्रस्ट सील मुख्यतः होमपेजवरच असते. त्यामुळे ट्रस्ट सील तपासल्यास तुमची फसवणूक होणार असल्यास ती टाळता येते.

4. वेबसाईटच्या प्रमाणपत्राचा तपशील पाहा.

कोणतीही नवीन वेबसाईट वापरताना त्या वेबसाईटच्या प्रमाणपत्राचा तपशील पाहा. यामुळे तुम्हाला वेबसाईट बनावट आहे की अधिकृत हे समजण्यास मदत होईल. प्रमाणपत्राचा तपशील तपासल्याने तुमचा वेबसाईटवरील विश्वास वाढेल.

5. सुरक्षित ब्राऊझिंग

अनेक वेळा तुमचा ब्राऊझर तुम्हाला वेबसाईटच्या धोक्याबाबत इशारा देत असतो. त्याकडे दुर्लक्ष करु नका.

मुंबई पोलिसांनी फसव्या आणि बनावट वेबसाइट कशा ओळखण्याचे हे मार्ग सांगितले आहेत. याशिवाय सायबर गुन्ह्यासंदर्भात कोणतीही तक्रार असल्यात तुम्ही मुंबई पोलिसांच्या 1930 या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा https://cybercrime.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तक्रान नोंदवू शकता.

# पन्हाळा तालुक्यातील शाळेची बस पलटी; जीवितहानी नाही, किरकोळ दुखापत

कोल्हापूर : कोल्हापुरातील पन्हाळा तालुक्यात कोतोली येथे लहान मुलांच्या खासगी शाळेची बस शेतात पलटी झाली. यामध्ये 20 ते 25 मुले प्रवास करीत होती, अशी माहिती मिळत असून, अनेकजण जखमी झाले आहेत. कोतोली परिसरातील काही गावांमधून मुलांना घेऊन ही बस शाळेकडे जात होती. मात्र, पिंपळे गावातून आळवे गावाकडे जाताना असलेल्या अरुंद रस्त्यावरू खाली शेतामध्ये ही बस पलटी झाली. येथील के. एस. चौगले इंग्लिश मीडियम शाळेमधील हे सर्व विद्यार्थी होते. शाळेमध्ये पालकांची




गर्दी : दरम्यान, बस पलटी होऊन अपघात झाल्याची माहिती समजताच उत्रे, वाघवे, पिंपळे गावातील जे काही विद्यार्थी यामधून आले होते. त्यांच्या पालकांनी तत्काळ शाळेत जाऊन याबाबत माहिती घेतली. एकूण 20 ते 25 विद्यार्थी यामधून शाळेकडे चालले होते. मात्र, पिंपळे गावातून आळवे गावात जात असताना अरुंद रस्त्यावरून बस जात असताना शेजारीच असलेल्या शेतात कोसळली आणि पलटी झाली. या सर्वांना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करून उपचार केले. कोणालाही गंभीर दुखापत झाली नसून, काहीजण किरकोळ जखमी आहेत.पावसाळी वातावरणामुळे रस्ते निसरडे : जिल्ह्यासह परिसरातील विविध भागांत आज सलग तिसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे रस्त्या रस्त्यांवर पाणी साचले असून, रस्तेदेखील निसरडे झाले असल्याने रस्त्यावरून वाहनेदेखील घसरून पडत आहेत. वातावरणदेखील ढगाळ स्वरूपाचे आहे.

# वयाचे बनावट कागदपत्रे बनवून गुजरातमध्ये लावून दिला अल्पवयीन मुलीचा विवाह; आई व मामावर गुन्हा दाखल

ठाणे - एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे बनावट आधारकार्ड ते शाळा सोडल्याच्या दाखल्यापर्यंतचा १८ वर्षे वयाचा पुरावा तयार करण्यात आला. तिचा विवाह गुजरातमधील २५ वर्षीय तरुणासोबत केल्याचा प्रकार उल्हासनगरमध्ये समोर आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीने हिललाईन पोलीसठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तिची आई व मामावर विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित मुलीचे शिक्षिका होण्याचे स्वप्न- पीडित मुलगी तिच्या आई व मामासह नेवाळी नाका भागात राहते. तिच्या आईला पूजा नावाच्या महिलेने पीडित मुलीसाठी गुजरातमध्ये विवाहासाठी मुलगा असल्याचे सांगितले. तेव्हापासून पूजा नावाच्या महिलेने मामाच्या मदतीने पीडित मुलीचे आधारकार्ड ते शाळा सोडल्याच्या दाखल्यापर्यंतचा १८ वर्ष वयाचा



पुरावा बनवला. तिचा विवाह गुजरातमधील तरुणाशी निश्चित केला. परंतु पीडित मुलीला पुढे शिकून शिक्षिका व्हायचे होते. मात्र तिच्या आईने ७ वी इयत्तेपर्यंतच कुटुंबाची परिस्थिती बिकट असल्यामुळे तिची शाळा बळजबरीने बंद केली. त्यातच विवाहसाठी पीडित मुलगी तयार नव्हती. तरी बळजबरीने मुलीची आई व मामाने पीडित मुलीला गुजरातमध्ये नेऊन तिचा २५ जून २०२२ रोजी जयेश नाथानी नावाच्या २५ वर्षीय तरुणाशी विवाह केला. मुलीच्या वडिलांना गुजरातमध्ये लग्नाला विरोध- तपास अधिकारी महिला पोलीस उपनिरीक्षक अंबिका घस्ते यांनी सांगितले कि, आई आणि मामाने पीडितेला लग्नासाठी जबरदस्ती केली होती. त्यांनी तिची सर्व कागदपत्रे बदलून २५ जून रोजी गुजरातमध्ये लग्न होईपर्यंत त्यांनी तिला कधीही घराबाहेर बाहेर जाऊ दिले नाही. मात्र मुलीच्या वडिलांनी गुजरातमधील लग्नाला विरोध केला. म्हणून मुलीच्या आईने तिच्या वडिलांना लग्नात सामील होऊ दिले नाही.

# अंडरवर्ल्डशी संबंध असलेला देशातील सर्वात मोठा DHFL बँक घोटाळा

मुंबई: डीएचएफएल बँक घोटाळ्याशी संबंधित सीबीआयने शुक्रवारी अजय नावंदरच्या घरी छापेमारी केल्यानंतर शनिवारी सीबीआयने आरोपी वाधवान बांधवांच्या सातारा जिल्ह्यातील महाबाळेश्वर येथील बंगल्यावर छापा टाकला. यावेळी सीबीआयला काही महागडे पेंटिग्ज मिळाल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे याप्रकरणी सीबीआयने केलेल्या तपासात या आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणाचे धागेदोरे थेट दाऊद इब्राहिमपर्यंत जात असल्याचा संशय वर्तवला जात आहे.दुसरीकडे राज्यात सत्ता परिवर्तनानंतर वाधवान बंधू यांच्याविरोधातील कारवाईला वेग आल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे. सीबीआयनं 40 कोटी रुपयांची पेंटिंग्स आणि मूर्ती जप्त केल्यात. या पेंटिंग्स आणि मूर्ती बँकेच्या घोटाळ्याच्या पैशातून खरेदी केल्याचा आरोप आहे. अजय नावंदर हा दाऊदचा हस्तक छोटा शकीलचा जवळचा साथीदार आहेत. घोटाळयातील काही पैसा नावंदरच्या माध्यमातून फिरवण्यात आल्याचा संशय सीबीआयला असून त्यादृष्टीने तपास सुरू करण्यात आला आहे. सीबीआय अधिकाऱ्यांनी या छापेमारीबाबत दिलेल्या माहितीनुसार, रेबिका दीवान आणि अजय रमेश नावंदर यांच्या मालमत्तांवर छापेमारी करण्यात आली. बँक घोटाळयाचे




पैसे आरोपींनी इतर लोकांनाही दिल्याची माहिती सीबीआयला मिळाली होती. या प्रकरणाच्या तपासात या दोघांची नावं समोर आली आहेत.रेबिका दीवान याप्रकरणातील मुख्य आरोपी कपिल वाधवान यांचा निकटवर्तीय असल्याची माहिती आहे. सीबीआयनं महाबळेश्वर आणि मुंबईतील काही ठिकाणांवर छापेमारी केली. या छापेमारी दरम्यान, अनेक महागडे पेंटिंग्स आणि मूर्ती जप्त करण्यात आल्या. याव्यतिरिक्त संशयास्पद कागदपत्रं आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणंही सीबीआयकडून जप्त करण्यात आली आहेत. नेमकं प्रकरण काय?- देशातील सर्वात मोठ्या बँक घोटाळ्याचा पर्दाफाश झालाय. सीबीआयकडून 34 हजार कोटींच्या घोटाळ्याप्रकरणी मुंबई आणि महाबळेश्वरमध्ये छापे मारी करण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणाचे धागेदोरे दाऊद टोळीपर्यंत पोहोचल्याचा संशय सीबीआयला आहे. कारण या छापेमारीत सीबीआयच्या हाती संशयास्पद कागदपत्रे लागली आहेत. त्यामुळे या बँक घोटाळ्यात अंडरवर्ल्डची एन्ट्री झाल्याचं मानलं जात आहे. देशातला आतापर्यंत सर्वात मोठा बँक घोटाळा उघड झालाय. सीबीआयनं 17 बँकांच्या समूहाला 34 हजार कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपांतर्गत 22 जून 2022 रोजी एफआयआर दाखल केला होता. आणि या प्रकरणी त्याच दिवशी तब्बल 12 ठिकाणी छापेमारी करण्यात आली होती.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898